## अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.११ यांची साक्ष

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

**माझे नाव** :- सुप्रिया संजीव वाटवे,
**वय** :– ५२ वर्षे, **धंदा** :– नोकरी,
**राहणार** :– आरुसई हॉस्टेल, ताथावडे, वाकड, जि.पुणे.

## सरतपासणी अभियोगपक्षातर्फे - श्री. बी.डी. काळे, विद्यमान सहा. सरकारी वकील यांचेमार्फत

०१. माझ्या घरी माझे पती, मुलगी व सासुबाई असे एकत्र राहतो. मी १७ वर्षे भारतीय समाज सेवा केंद्र माधवनगर, सांगली येथे वरिष्ठ समाज सेवक म्हणून काम करत होते. या समाजसेवा केंद्राचे कार्य म्हणजे ० ते ६ वर्षाच्या बालकांचे बालकल्याण समितीमार्फत अनाथ, नको असलेली मुले, पोलिसांमार्फत आलेली मुले यांचे संगोपण करणे आणि दत्तक मार्फत पुर्नवसन करणे. मी भारतीय समाज सेवा केंद्र माधवनगर, सांगली येथे सन २००० ते २०१७ पर्यत सामाजिक कार्यकर्ती म्हणून कार्यरत होते.

०२. मी आरोपींना ओळखते. आरोपी क्र. १ चे नाव रुपाली वाघमारे आणि आरोपी क्र. २ चे नाव धनाजी गळवे आहे. मी आरोपी क्र. १ यांना पाहिल्यास ओळखू शकते. ते आज न्यायालयात हजर नाहीत. आरोपी क्र. २ आज न्यायालयात हजर आहेत. आरोपी क्र. १ आणि २ यांचे पाच दिवसांचे अपत्य त्यांनी जमिनीमध्ये पुरले होते. पोलिसांनी ते जिवंत अर्भक सिव्हील हॉस्पीटल सांगली येथे दाखल केले. व बालकल्याण समितीच्या आदेशान्वये ते अर्भक आमच्या समाजसेवा केंद्र मध्ये दाखल झाले. त्या अर्भकाचा जन्म आरोपी क्र. १ व २ यांच्या अनैतिक संबंधामधून झाला होता. ते अर्भक आमच्या समाजकेंद्रमध्ये आल्यानंतर पोलिसांनी त्या अर्भकाचे आणि आरोपी क्र. १ आणि २ चे डी.एन.ए. टेस्ट करुन घेतल्या. बाळ आमच्या समाज केंद्रामध्ये आले त्यावेळेस माझ्यासोबत केअर टेकर म्हणून सुशिला चित्रुक या उपस्थित होत्या. त्या बाळाला आम्ही संस्थेत दाखल करुन घेतले व त्यांचे संगोपण केले. त्या अर्भकाचे बालकल्याण समितीच्या आदेशान्वये डी.एन.ए. टेस्ट करण्याकरिता मी स्वतः अर्भकाला घेवून गेले होते.

०३. नियमाप्रमाणे ३ महिन्याच्या आत आम्हाला पोलिसांकडून गुन्हयाचा अ फायनल झाली आहे का याबाबत चौकशी करावी लागते त्यानुसार आम्ही आटपाडी पोलिस स्टेशनला चौकशी केली असता, त्यांनी आम्हाला कळविले की, त्या अर्भकाचे जन्मदाते मिळून आले आहेत. त्यानंतर आरोपी क्र. १ व २ यांना बालकल्याण समिती समोर आम्ही हजर केले. आरोपी क्र. १ व २ यांनी अनैतिक संबंधातून मूल झाले

असल्यामुळे त्यागपत्र भारतीय समाजसेवा केंद्र माधवनगर यांना करुन दिले. त्यानंतर त्या बाळाचे संगोपण करुन त्यास बाल कल्याण समितीच्या आदेशान्वये दत्तक दिले आहे.

०४. आता मला पोलिसांना दि. ०३/१०/२०१४ रोजीचे अर्भक ताब्यात घेण्याबाबतचे पत्र दाखविण्यात आले. त्यावर पोलिस निरीक्षकांची सही आहे. सदर अर्भकाची डी.एन.ए. चाचणी करण्याकरीता पोलिस स्टेशन आटपाडी मधून आमच्या समाजसेवा केंद्रास दि. ०६/१०/२०१४ रोजी पत्र प्राप्त झाले होते. आता मला सदर पत्राची मुळ प्रत दाखविण्यात आली त्यावर आमच्या समाजसेवा केंद्राचे तात्कालीन संचालिका उज्वला परांजपे यांची सही आहे. ते मी ओळखते आणि भारतीय समाजसेवा केंद्राचा शिक्का आहे. सदर पत्रास **नि. ८३** देण्यात येतो. ( यावेळी आरोपीच्या वकीलांनी असा आक्षेप नोंदविला की, या पत्रावर साक्षीदार यांची सही नाही त्यामुळे त्यास निशाणी देता येणार नाही. सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी असा युक्तीवाद केला की, त्या पत्रावर भारतीय समाजसेवा केंद्राचा शिक्का असून त्यावर तात्कालीन संचालकाची सही आहे ते सही साक्षीदार सोबत काम करत असल्याने ओळखतात त्यामुळे त्यास निशाणी देण्यात यावी. सदर मुद्दा अंतिम युक्तीवादाच्या वेळी युक्तीवाद करण्यास खुला ठेवण्यात येतो. सदर पत्रास तात्पुरती **नि. ८३** देण्यात येते.)

०५. भारतीय समाजसेवा केंद्र माधवनगर सांगली यांनी त्या अर्भकाचे नाव जिग्नेश असे ठेवले होते. मी दि. ०७/११/२०१४ रोजी पोलिस स्टेशनला गुन्हयाचे अ फायनल झाले किंवा नाही या संदर्भात पाठविलेले पत्राची मुळ प्रत मला दाखविण्यात आली त्यावर माझी सही आहे त्यातील मजकूर बरोबर आहे त्यास **नि. ८४** देण्यात येते. आता मला दि. ०७/११/२०१४ आणि दि. २२/०१/२०१५ चे मी पोलिस स्टेशनला अर्भकाच्या जन्मदात्यांना बालकल्याण समिती समक्ष हजर करण्या संदर्भात पाठविलेले पत्र दाखविण्यात आले त्यावर माझी सही आहे व भारतीय समाजसेवा केंद्राचा शिक्का आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास अनुक्रमे **नि. ८५ व नि. ८६** देण्यात येते.

०६. दि. १७/११/२०१४ रोजी पोलिसा स्टेशन आटपाडी यांनी मी दि. ०७/११/२०१४ रोजी पाठविलेल्या पत्राची उत्तर दिले आहे त्यावर पोहोच म्हणून माझी सही आहे त्यातील मजकूर बरोबर आहे त्यास **नि. ८७** देण्यात येते.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे - श्री. पी.डी. जेडगे विद्यमान वकील यांच्यामार्फत सुरु</u>**

०७. माझे शिक्षण एम.एस.डब्लू. झाले आहे. मी भारतीय समाजसेवा केंद्र

माधवनगर सांगली येथे नोकरी करत होते असे दाखविणारा कागदपत्री पुरावा आता माझ्याकडे नाही. साक्षीदार सांगतात, मी दाखल करु शकते. हे खरे आहे की, मी नोकरी करत असले तर मला त्या समाजसेवा केंद्राचे ओळखपत्र मिळते. साक्षीदार सांगतात की, नोकरी सोडल्यानंतर ते जमा करावे लागते.

**आरोपी वकीलांच्या तोंडी विनंती वरुन उलटतपास पुढील तारखेपर्यत तहकुब.**

श्रवणोत्तर स्विकृती,

Sd/-

**(आर. बी. कुलकर्णी)**
सह न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
आटपाडी

दि. ११/०९/२०२५
ठिकाणः आटपाडी.